# लीलावती चॅम्पियन



## आयडियल आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट

मुंबई, दि. ५ (क्री.प्र.) - लीलावती हॉस्पिटलने अष्टपैलू रूपेश कोंडाळकर व अंकित साळसकर यांच्या अप्रतिम खेळामुळे नानावटी हॉस्पिटलचा १३ धावांनी पराभव केला आणि द्वितीय आयडियल आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. दमदार फलंदाजीसह गोलंदाजीत हॅटट्रीक साधणारा रूपेश कोंडाळकरला स्पर्धेतील सर्वोत्तम क्रिकेटपटूचा पुरस्कार माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे व क्रिकेटप्रेमी गोविंदराव मोहिते यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी आयडियल हॉस्पिटल क्रिकेटर अॅवॉर्डद्वारे ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलचे क्रिकेटपटू प्रदीप क्षीरसागर यांना तर आयडियल लाइफटाइम अचिव्हमेंट अॅवॉर्डद्वारे क्रीडा संघटक लीलाधर चव्हाण यांना सन्मानचिन्हाने गौरविण्यात आले.

लोकसेवा फाऊंडेशन; आयडियल स्पोर्टस् अॅकडमी-आयडियल क्रिकेट क्लब आयोजित शिवाजी पार्क मैदानामधील आंतर हॉस्पिटल क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना अटीतटीमध्ये रंगला. लीलावती हॉस्पिटलचे सलामीवीर मनोहर पाटेकर (१४ धावा), विजय नाडकर (१३ धावा), संदीप कणसे (१६ धावा) आदी फलंदाजांना खेळपट्टीवर अधिक काळ टिकू न देण्यात नानावटी हॉस्पिटलचे गोलंदाज यशस्वी ठरले. तरीही लीलावती हॉस्पिटलने रूपेश कोंडाळकरच्या दमदार ३८ धावांमुळे नानावटी हॉस्पिटल संघाविरुद्ध आव्हानात्मक सर्व बाद ११८ धावसंख्या रचली. आशुतोष घागरे (९ धावांत २ बळी) व नितीन रांजे (३२ धावांत ३ बळी) यांनी छान गोलंदाजी केली. विजयी आव्हान नानावटी हॉस्पिटल संघाच्या आवाक्यात असतानाही त्यांच्या पहिल्या तीन फलंदाजांना धावांचे खाते उघडण्यापूर्वीच तंबूत धाडण्याची करामत विशाल शिंदे (९ धावांत २ बळी) व योगेश जांभळे (२५ धावांत २ बळी) यांच्या गोलंदाजीने केली आणि नानावटी हॉस्पिटलची अवस्था ३ बाद ३ धावा अशी बिकट झाली. तरीही न डगमगता अशोक कदम (२५ धावा), प्रतीक पाताडे (२४ धावा) व नितीन रांजे (१७ धावा) यांनी नानावटी हॉस्पिटल संघाला ८ बाद १०४ धावा असे विजयासमीप नेले होते, परंतु अंकित साळसकरने (११ धावांत २ बळी) १९ व्या षटकांत अचूक गोलंदाजी करून नानावटी हॉस्पिटल संघाला १०५ धावांत गुंडाळले.